2021-22

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

आज़ादी का
अमृत महोत्सव

**Year - 7, Vol.I, Issue-LIV, 9 May 2022**

Kisan Shikshan Prasarak Mandal, Udgir's

# Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur

NAAC Accredited with 'B' Grade

Dist. Latur State : Maharashtra (431515)

**ONE DAY INTERNATIONAL CONFERENCE (ONLINE)**

Organized By Department of Economics

On

## The Global Relevance of Indian Economic Thoughts

## भारतीय आर्थिक विचारांची वैश्विक प्रासंगिकता



Cheif Editor : Principal Dr. Vasant Biradar

**Editor :** Dr. D. D. Choudhri

Assistant Professor

Research Journal

Sports, Commerce, Science, Education,

Medical, Ayurveda, Pharmaceutical

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | AMALGAMATION OF TRADITIONAL ECONOMIC THOUGHTS AND MODERN EDUCATION: NEED OF HOUR | Dr. Mahesh Joshi<br>Dr. Goldie Zaki | 01 |
| 02. | ECONOMIC THOUGHTS OF MAHATMA GANDHI AND ITS GLOBAL RELEVANCE | Prof. Dr. R. M. Bhalera<br>Mr. Govind P. Pawar | 06 |
| 03. | GANDHIAN THOUGHTS ON ECONOMICS | Dr. Padmakar Tukaram Ghule<br>Dr. Arvind Shelar | 11 |
| 04. | GLOBAL RELEVANCE OF POST-INDEPENDENCE PERIOD INDIAN ECONOMIC THOUGHTS | Dr. Vinayak Nagarao Shinde | 13 |
| 05. | THE RELEVANCE OF GANDHIAN ECONOMICS TO MODERN INDIA | Dr. Rajkumar Laxmikant Joshi | 18 |
| 06. | ECONOMIC THOUGHTS OF DADABHAI NAUROJI IN PRE-INDEPENDENCE PERIOD OF INDIA" | Dr. Parag P. Kadam | 25 |
| 07. | THE GREAT ECONOMIC THINKAR:DR.BABASAHEBAMBEDKAR | Dr. M. P. Deshmukh<br>Purabi Bhattachryya | 28 |
| 08. | RELEVANCE OF CHANAKYA'S TEACHINGS IN MODERN ECONOMIC SPHERE | Dr. Harinder Kour | 31 |
| 09. | MODERN ECONOMICS AND KAUTILYA'S ARTHASHASTRA | Dr. Dini Menon | 32 |
| 10. | कौटिल्य - आर्थिक विचार आणि प्रासंगिकता | डॉ. दिगंबर भगवानराव रोडे | 33 |
| 11. | कौटिल्य यांच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील प्रासंगिकता | डॉ. व्यंकटेश काळुराम मदनुरे | 37 |
| 12. | कौटिल्य यांच्या विचारांची वैश्विक प्रासंगिकता | प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे | 41 |
| 13. | दादाभाई नौरोजी यांच्या आर्थिक विचारांची वैश्विक प्रासंगिकता | प्रा. डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव | 45 |
| 14. | प्राचीन भारत के आर्थिक विचारोंकी--वैश्विक प्रासंगिकता | डॉ. शेख रशिदा रहेमतुल्ला | 48 |
| 15. | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार व प्रासंगिकता | डॉ. भरत बाबुराव नागरगोजे<br>डॉ. दिगंबर भगवानराव रोडे | 52 |


Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)



158

# कौटिल्य यांच्या विचारांची वैश्विक प्रासंगिकता

प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

भारतीय विचारवंत कौटिल्य हे प्राचीन काळातील प्रमुख आर्थिक विचारवंत आहेत. कौटिल्य यांचे विचार म्हणजे अर्थशास्त्राची खऱ्या अर्थाने सुरुवात आहे. कौटिल्य यांचा कालखंड हा इ.स.पूर्व 321 ते 296 हा आहे. अर्थशास्त्राच्या विचारा संबंधी वैदिक वाङ्मय, उपनिषदे,रामायण,महाभारत अशा अनेक ग्रंथांमध्ये उल्लेख आढळून येतो. कौटिल्य यांनी लिहिलेल्या अर्थशास्त्र या लिखित स्वरूपातील विचारा पासून अर्थशास्त्राच्या अभ्यासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाल्याचे दिसून येते. कौटिल्य यांनी राजाने कल्याणकारी राज्याची निर्मिती कशी करावी व त्यासाठी अर्थ-संपत्ती कशा पद्धतीने उपलब्ध करावी त्याचे मार्ग काय असावे आणि उपलब्ध झालेल्या संपत्तीच्या मदतीने राज्यातील व्यक्तींचे कल्याण कशा पद्धतीने केले जावे या संदर्भात मार्गदर्शक असे विचार अर्थशास्त्रीय स्वरूपात मांडले आहेत. कौटिल्याने कृषी, व्यापार-उद्योग, सार्वजनिक आय-व्यय व राज्याची कार्य यासंदर्भात आर्थिक विचार मांडले आहे. कौटिल्य यांचे हे विचार म्हणजे कौटिल्य पासून ते वास्तव शासन पद्धतीला एक मार्गदर्शक दिशा देणारे असे विचार आहेत.

**संशोधनाची आवश्यकता**

प्राचीन काळातील विचारांच्या अभ्यासाच्या आधारे आपणास त्या काळातील आर्थिक स्थितीचे वर्णन, विश्लेषण उपलब्ध होते. यामुळे त्या काळातील उद्योग,व्यवसाय,व्यापार,सामाजिक-आर्थिक स्थिती या विषयी माहिती मिळते, स्थितीची कल्पना येते. कौटिल्य यांच्या काळामध्ये राज्यशाही शासनपद्धती होती त्या काळात राज्यशाही शासन पद्धतीचा मुख्य उद्देश कल्याणकारी राज्यांची निर्मिती करणे हा होता आणि आजही राज्यशाही शासन पद्धतीमध्ये बदल होऊन लोकशाही शासन पद्धती आपण स्वीकार केलेला आहे.परंतु दोन्ही प्रकारच्या शासन पद्धतीचा मुख्य उद्देश एकच आहे तो म्हणजे कल्याणकारी राज्यांची निर्मिती करणे ही एक समानता दोन्ही कालखंडामध्ये दिसून येते. याचा आढावा घेण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुत लघु संशोधन करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) अर्थशास्त्रज्ञ कौटिल्य यांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
2) कौटिल्य यांचे विचार आणि आजची स्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास करने.
3) कौटिल्य यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता विश्लेषण करने.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या दुय्यम पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संशोधन अभ्यास संदर्भातील यापूर्वी लिखित ग्रंथ,क्रमिक पुस्तके, मासिके यातील लेख या साधनांचा आधार घेण्यात आला



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.

159

आहे.

**कौटिल्य यांच्या आर्थिक विचारांची वैश्विक प्रासंगिकता विश्लेषण**

अर्थशास्त्रज्ञ कौटिल्य यांनी आपल्या विचारांमध्ये मानवी कल्याण व कल्याणकारी राज्याची निर्मिती हा घटक केंद्रबिंदू मानून कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्याच्या उद्देशाने राज्य शासन पद्धतीमध्ये सरकारच्या उत्पन्नाचे विविध मार्ग,सरकारचा खर्च आणि त्या काळामध्ये कृषी व इतर उत्पादनाची जी व्यवस्था आहेत या सर्व घटकांवर प्रकाश टाकल्याचे त्यांच्या विचारातून केल्याचे दिसून येते. त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारा संबंधीचा आढावा खालील प्रमाणे

**संपत्ती विषयक विचार**

अर्थशास्त्रज्ञ कौटिल्य यांच्यामते 'संपत्ती हा राष्ट्राच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे. संपत्तीच्या आधारे राष्ट्राला विकसित व कल्याणकारी राज्याचे निर्मिती करता येणे शक्य होते.संपत्ती हे विकासाचे साधन आहे'.[1] त्यामुळे संपत्तीच्या मदतीने जनतेचे पालन पोषण, दानधर्म, दुष्काळ दूर करणे यासारखे कार्य करता येणे शक्य होते. त्यामुळे गरजा पूर्ण झाल्याच्या नंतर काही संपत्तीचा संचय करून ठेवणे हाही महत्त्वाचा घटक मानला आहे. संपत्तीमध्ये पैसा, वस्तू, सोने-चांदी संचित संपत्ती या घटकांचा समावेश केला आहे. 'संपत्तीमध्ये वास्तविकता, उपभोग क्षमता, हस्तांतरण आणि मालकी हक्क प्रस्थापित करणे हे गुण असावे असाही उल्लेख त्यांनी केला आहे.'[2]

कौटिल्य यांनी सांगितलेले संपत्ती विषयक विचार आजही लागू होतात कारण संपत्तीमध्ये वस्तू,पैसा ,सोने-चांदी, संचित संपत्ती याचा समावेश होतो. संपत्ती मध्ये वास्तविकता, उपभोग क्षमता, हस्तांतरण आणि मालकी हक्क प्रस्थापित करण्याचे गुण आहेत. संपत्तीच्या मदतीने देशांमध्ये निर्माण होणारे मानव व नैसर्गिक संकटे दूर करण्यासाठी संपत्तीची महत्त्वाची भूमिका असते हे वास्तव आहे आहे.

**सार्वजनिक आयव्यय विषयक विचार**

कौटिल्य यांनी सार्वजनिक आय-व्यय या महत्त्वपूर्ण घटकाविषयी आपले विचार स्पष्ट केले आहेत. सरकारी उत्पन्न आणि संपत्ती हा महत्त्वाचे घटक आहे कारण संपत्ती हे विकासाचे एक साधन आहे सार्वजनिक आयव्यय याची महत्त्वाचे साधन म्हणून कर या घटकावर वर त्यांनी भर दिला आहे. 'कराचे त्यांनी दोन भाग केलेत त्यामध्ये देशातील वस्तूवरील कर आणि आयात निर्यात वस्तू वरील कर आयात वस्तू वरील कर हा उत्पादन खर्चाच्या 1/5 असावा. निर्यातीला प्रोत्साहन दिले जाऊ नये'.[3] कर हा वर्षातून एकदाच आकारावा आणि श्रीमंतांवर अधिक तर गरिबांना कमी असावा, करदात्यावर हा असाह्य होऊ नये, समाज कल्याणला हानिकारक अशा चैनीच्या वस्तू वरील कर अधिक असावा अशा मार्गदर्शक सूचनाही त्यांनी केल्या आहेत. सरकारी उत्पन्नाचे घटक म्हणून त्यांनी उद्योग, जंगले, खाणी, मासेमारी, 'जमीन महसूल हा जमिनीतील उत्पन्नाच्या 1/12 ते 1/3 या प्रमाणात असावा'[4] तसेच रस्ते घर फळबागा या घटकावर कर आकारला जावा आणि व्यापार हा राज्याच्या उत्पनाचा महत्त्वपूर्ण घटक आहे याचा उल्लेख केला आहे.

सद्यस्थितीमध्ये ही कौटिल्य यांनी सार्वजनिक आयव्यय यासंदर्भात मांडलेले विचार आणि केलेल्या मार्गदर्शक सूचना यानुसारच केंद्र-राज्य सरकार यांच्या आयव्ययाची रचना असल्याचे दिसून येते.



Assistant Professor
College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

सरकारी अंदाजपत्रका विषयी मात्र भिन्नता दिसून येते. अलीकडील काळात सरकारच्या अंदाजपत्रक हे सामान्यतः तुटीचे अंदाजपत्रक असते तर कौटिल्य यांच्यामते सरकारची अंदाजपत्रक हे सामान्यतः तुटीचे नसावे आणि जर ती तूट निर्माण झाली तर कर्जातून भरुन काढावे.

**कृषी विषयक विचार**

भारतीय प्राचीन अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र हे प्रमुख क्षेत्र असल्याचे दिसून येते. कौटिल्य यांनी शेती क्षेत्राला आपल्या विचारांमध्ये महत्त्वाचे स्थान दिले आहे.त्यांच्या मते शेती हा एक महत्त्वाचा विकासाचा घटक आहे शेतीमधून समाजाला अन्नधान्य,पशुधन,सुवर्ण आणि स्वस्त श्रमशक्ती उपलब्ध होत असते. यामुळे शेतीवर शासनाच्या वतीने नवीन प्रयोग करण्यासाठी एक अधिकारी नेमावा त्याआधारे शेतीचे आधुनिकीकरण करा, कृषी विकास करण्याची जबाबदारी ही समाजाची आणि राज्याचे संयुक्तरीत्या आहे असे विचार त्यांनी मांडले.

आधुनिक काळातही भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्र हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. 'एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्या जवळपास 80 टक्के लोकांचे प्रमुख उपजीविकेचे साधन कृषी आहे'.5

**किंमत नियंत्रण विषयक विचार**

अर्थव्यवस्थेतील ग्राहकांचे व्यापाऱ्यांकडून लूट होऊ नये या उद्देशाने सरकार कडून वस्तू व सेवांच्या किमतीवर नियंत्रण ठेवले जावे. विशेषतः जीवनावश्यक वस्तू आणि मेवा यांचा व्यापार शासनाने मान्य केलेल्या व्यापाऱ्याकडून व्हावा की, ज्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढणार नाहीत आणि समाजात दारिद्र्य निर्माण होणार नाही ही त्या पाठीमागची भूमिका असल्याचे दिसून येते.

लोकशाही पद्धतीमध्येही शासनाचे किंमत नियंत्रण ठेवणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी शासन काम करत असल्याचे दिसून येते.

**कल्याण विषयक विचार**

कौटिल्य यांच्या काळातही सामाजिक कल्याण हा एक महत्त्वपूर्ण घटक असल्याचा त्यांच्या विचारातून दिसून येतो. सामाजिक कल्याणाची जबाबदारी ही राजाची असून राजाने त्यासाठी प्रयत्न करावेत देशाला आणि समाजाला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनवण्यासाठी वस्त्रोद्योग पशुपालन हस्तव्यवसाय यांच्या विकास निर्मितीवर भर द्यावा,उपभोग व वितरण यावर नियंत्रण ठेवून कल्याणकारी राज्याची निर्मिती करावी. आजही शासन कल्याणकारी राज्याच्या निर्मितीच्या उद्देशाने कार्य करीत असल्याचे दिसून येते.

**सामाजिक सुरक्षितता विषयक विचार**

सामाजिक कल्याण बरोबरच सामाजिक सुरक्षितता हा घटक महत्त्वाचा आहे असे विचार कौशल्यांचे आहेत. सामाजिक सुरक्षितता राखण्याची जबाबदारी राज्यांची आहे.त्यासाठी राज्याने जाती-धर्म यामध्ये तेढ निर्माण होनार नाही त्याचबरोबर गरीब, दुर्बल अशा लोकांसाठी कार्य करावे त्यांना संरक्षण द्यावे.

सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्याची जबाबदारी आजही आपण पाहतो की,शासनाची आहे. आणि ती जबाबदारी शासनाकडून पूर्ण करण्याचा प्रयत्न अविरतपणे चालू आहे.

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



160 A

## सारांश

अर्थशास्त्रज्ञ कौटिल्याने इ. स. पूर्व काळामध्ये मांडलेले आर्थिक विचार त्यामध्ये राज्याचे संपत्ती निर्मिती, जमीन महसूल, किंमत नियंत्रण, कल्याण, सामाजिक सुरक्षितता, राष्ट्र विकास या एकूण आर्थिक विचारांचा अभ्यास करताना असे दिसून येते की, विसाव्या शतकामध्ये ही कौटिल्य यांचे विचार लागू होतात कारण आजची शासन पद्धती आणि कौटिल्याचे विचार यामध्ये फार काही फरक जाणून येत नाही कौटिल्याच्या आज विचाराप्रमाणे आजची शासन पद्धती कार्य करत असल्याचे दिसून येते त्यामध्ये सरकारचे उत्पन्न- खर्च कल्याण, सामाजिक सुरक्षितता, किंमत नियंत्रण, कर, राष्ट्र विकास या व इतर शासनाच्या कृतीमध्ये कौटिल्य यांच्या विचारांचा संदर्भ आहे. त्यामुळे कौटिल्याच्या वैश्विक प्रासंगिकता असल्याचे दिसून येते.

## संदर्भसूची

1) रामनरेश त्रिपाठी, 1981, प्राचीन भारतीय आर्थिक विचारवंत, पोहरा पब्लिकेशन अँड डिस्ट्रीब्युटर्स ईलाबाद. पृष्ठ क्रमांक 26
2) एम.सी.वैश, 1980आर्थिक विचारोका इतिहास, पृष्ठ क्रमांक-509
3) विद्याधर पटवर्धन, 1993, आर्थिक विचारांचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे पृष्ठ क्रमांक-129
4) कित्ता पृष्ठ क्रमांक-130
5) विजय कविमंडन, 1996 कृषी अर्थशास्त्र मंगेश प्रकाशन, नागपुर प्रु.क्र.08
6) डॉ.विजय कवी मंडन, आर्थिक विचारांचा इतिहास.
7) के.एच. ठक्कर आर्थिक विचारांचा इतिहास.
8) दुर्गा भागवत कौटिलीय अर्थशास्त्र.
9) Www.wicopedia.com
10) youtube.com

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



161